॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. समन्वय/२०२६-२७/९९२५ दिनांक : २६/११/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या परीक्षेतील उत्तरपुस्तिकांच्या मूल्यांकनासाठी प्राध्याकांना कार्यमूक्त करणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक १७/११/२०२६ पासून व पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक ०१/१२/२०२६ पासून सुरु होणार आहेत.

प्रस्तुत विद्यापीठाने विद्यापीठाकडे उपलब्ध असलेल्या यादीनुसार महाविद्यालयाच्या नियमित आस्थापनेवर असलेल्या शिक्षकांना हिवाळी-२०२६ च्या परीक्षेतील उत्तरपुस्तिका मूल्यांकन/नियमान करण्यासाठीचे कार्यादेश निर्गमित केलेले आहे. ज्या शिक्षकांची नियुक्त तासिका/करार पध्दतीवर करण्यात आलेली आहे अशा शिक्षकांच्या नावाची यादी विद्यापीठाकडे उपलब्ध नसल्यामुळे संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार किमान तीन सत्र शिकविण्याच्या अनुभव असणा-या प्राध्यापकांना आपल्या स्तरावरुन मूल्यांकन/नियमनाचे कार्यासाठी कार्यादेश निर्गमीत करावे व संबंधीत प्राध्यापकांना उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करणेसाठी नजीकच्या E-CAP वर रुजू होण्यास कार्यमूक्त करावे. कार्यमूक्त केलेल्या शिक्षकांची यादी/प्रत संचालक, केंद्रीय मूल्यांकन केंद, हिवाळी परीक्षा-२०२६ यांच्या directorcap999@gmail.com या ई-मेलवर पाठवावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
समन्वयक, E-CAP, हिवाळी-२०२६ परीक्षा प्रस्तुत विद्यापीठ - यांना देवून कळविण्यात येते की प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ E-CAP वर उत्तरपुस्तिकेचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षकांना रुजू करुन घेतांना विद्यापीठाचे /प्राचार्यांचे कार्यादेश व कार्यमूक्तीचे आदेश तसेच ओळखपत्र असल्याशिवाय रुजू करुन घेण्यात येवू नये. रुजू करुन घेतल्यास त्याची सर्वस्वती जबाबदारी संबंधीत ई-कॅप कॉर्डीनेटर यांची राहील याची नोंद घ्यावी.